लोकमत

कोरोनाचा परिणाम : प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत मंडळांनी केले साधेपणाने विसर्जन

# चतुर्दशीदिवशी ध्वनिप्रदूषणात घट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील तरुण मंडळांनी अनंत चतुर्दशी दिवशी साध्या पद्धतीने बाप्पांचे विसर्जन केले. त्यामुळे शहरातील ध्वनिप्रदूषणात यंदा कमालीची घट झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या पाहणीतून दिसून आले आहे. या पाहणीमधील निरीक्षणांबाबतच्या अहवालाची माहिती या विभागाने बुधवारी दिली.

पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. ए. एस. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, अजय गौड, एम. एस्सी. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी योगेश गलगले, अनिकेत मोराळे ध्वनी पातळी मापनाचे काम केले. त्यांनी शांतता, रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक या क्षेत्रांमध्ये २२ परिसरामध्ये मापन केले. यावर्षी शांतता क्षेत्रातील सीपीआर, न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ आणि रहिवासी क्षेत्रातील उत्तरेश्वर पेठ, शिवाजी पेठ, ताराबाई पार्क, व्यावसायिक क्षेत्रातील पापाची तिकटी, गंगावेश येथील ध्वनी पातळी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मानकांपेक्षा थोडी वाढलेली आहे. पण, गेल्या पाचवर्षापेक्षा या ध्वनी पातळीमध्ये कमालीची घट झाली आहे.

**यंदाची ध्वनी पातळी (डेसिबलमध्ये)**

| क्षेत्र | | | | |
|---|---|---|---|---|
| शांतता | 55.97 सीपीआर परिसर | 46.51 न्यायालय परिसर | 45.62 जिल्हाधिकारी कार्यालय | 41.73 शिवाजी विद्यापीठ |
| निवासी | 39.47 राजारामपुरी | 46.52 उत्तरेश्वर पेठ | 46.65 शिवाजी पेठ | 38.11 मंगळवार पेठ |
| निवासी | 40.29 नागाळा पार्क | 46.87 ताराबाई पार्क | | |
| औद्योगिक | 45.12 उद्यमनगर | 43.45 वाय. पी. पोवार नगर | | |
| वाणिज्य | 54.05 महाद्वार रोड | 51.02 राजारामपुरी | 42.93 लक्ष्मीपुरी | 42.05 शाहूपुरी |



**'सीपीसीबी'ची मार्गदर्शक पातळी (डेसिबलमध्ये, रात्रीच्या वेळी)**

| क्षेत्र | पातळी |
|---|---|
| औद्योगिक | ७० |
| वाणिज्य | ५५ |
| निवासी | ४५ |
| शांतता | ४० |

# ‘केआयटी’मध्ये ऑनलाईन संवाद सत्र

आर.के.नगर : जागतिक स्तरावर कोरोना या महामारीने थैमान घातले आहे. मानव निर्मित संकटाने माणसाचे मानसिकदृष्ट्या जास्त खच्चीकरण झाले. अशा परिस्थितीत मानसिक स्थिरता व सक्षमतेद्वारे आव्हानांवर यशस्वी मात करणे शक्य आहे, असे मत ‘केआयटी’मध्ये ऑनलाईन संवाद सत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले. केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ‘मनमोकळा श्वास’ हे संवाद सत्र झाले. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी उद्घाटन केले. यादरम्यान डॉ. कल्याणी कुलकर्णी, वैशाली बुटाले यांनी मार्गदर्शन केले. प्रा दीपक महाजन यांनी सूत्रसंचालन केले. प्रा अरुण देसाई व प्रा अजय कापसे यांनी या संवादाची तांत्रिक बाजू सांभाळली. प्रा.अमित वैद्य यांनी आभार केले.

लोकमत

# अंतिम सत्राची परीक्षा असेल सोपी! : सामंत

मुंबई : विद्यापीठ व महाविद्यालयांच्या



अंतिम सत्राच्या परीक्षा सोप्या पद्धतीने घेण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेबाबत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी सकारात्मक असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

अंतिम सत्राच्या परीक्षांबाबत कुलगुरुंचे अहवाल, विद्यार्थी प्रतिनिधी आणि संघटनांच्या भूमिकेची माहिती देण्यासाठी सामंत यांनी बुधवारी राजभवन येथे राज्यपालांची भेट घेतली. परीक्षा सहज, सोप्या पद्धतीने कशा घेता येतील यावर विचार करावा. कुलगुरुंचे काय म्हणणे आहे ते जाणून घ्यावे, समितीचा अहवाल आल्यानंतर चर्चा करुन विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा अशा सूचना राज्यपालांनी केल्याचे सामंत यांनी माध्यमांना सांगितले.

दरम्यान, ऑनलाइन परीक्षांबाबत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसह गरीब विद्यार्थ्यांसमोर नेटवर्क व संसाधनांच्या समस्या आहेत. त्यावर सोप्या पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत चर्चा सुरु आहे.

Kolhapur Main
Page No. 5 Sep 03, 2020
Powered by: erelego.com

# ध्वनिप्रदूषणात लक्षणीय घट

## विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे सर्वेक्षण

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा अनंत चतुर्दशीला विसर्जन मिरवणूक निघाली नाही. यामुळे वाद्यांचा कडकडाट, डॉल्बीचा दणदणाट नव्हता. लोकांची गर्दीही नव्हती. त्यामुळे ध्वनी प्रदूषणात लक्षणीय घट झाली.**

राजारामपुरी, महाद्वार रोड, मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, पापाची तिकटी या मिरवणूक मार्गावरील ध्वनिप्रदूषणात सुमारे ५० ते ५५ टक्के घट झाल्याचे निदर्शनास आले. याबाबतचे सर्वेक्षण शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केले. याचा तुलनात्मक अहवालही त्यांनी बनवला. विभागप्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव, डॉ. चेतन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश गलगले, अनिकेत मोराळे यांनी हे सर्वेक्षण केले.



**कोल्हापूर : गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजताना योगेश गलगले आणि अनिकेत मोराळे.**
(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)



**ध्वनिप्रदूषणाची तुलनात्मक आकडेवारी (आकडे रात्रीचे व डेसिबलमध्ये)**

| झोन | ठिकाण | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|---|---|---|
| सायलेंट | सीपीआर | ६७.६ | ५५.६३ | ५४.९१ | ५२.१४ | ५५.९७ |
| | कोर्ट | ६३.२ | ५८.०९ | ५४.३ | ५२.७१ | ४६.५१ |
| | शिवाजी विद्यापीठ | ५५.२ | ४६.३६ | ४३.६१ | ४२.८९ | ४१.७३ |
| रहिवासी | राजारामपुरी | ६२.४ | ४९.१३ | ५१.३३ | ५१.०१ | ३९.४७ |
| | उत्तरेश्वर पेठ | ६३.५ | ६६.२४ | ६४.४७ | ६२.११ | ४६.५२ |
| | शिवाजी पेठ | ६३.८ | ५०.९६ | ६९.१३ | ६८.३७ | ४६.६५ |
| | मंगळवार पेठ | ७९.९ | ६०.८५ | ५७.०३ | ५५.४४ | ३८.११ |
| | नागाळा पार्क | ५८.५ | ५०.९६ | ४६.८ | ४६.६९ | ४०.२९ |
| | ताराबाई पार्क | ६१.८ | ४८.२४ | ४७.९५ | ४६.२९ | ४६.८७ |
| व्यावसायिक | मिरजकर तिकटी | ९६.१ | ७७.७५ | ७६.८३ | ७५.४३ | ५१.७६ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ९६.५ | ८४.६६ | ८४.३२ | ८२.३७ | ४४.९३ |
| | महाद्वार रोड | ९९.५ | ७१.६३ | ९९.२४ | ८८.४७ | ५४.०५ |
| | गुजरी कॉर्नर | ९७.७ | ७४.९२ | ८५.७६ | ८५.०६ | ४३.७९ |
| | पापाची तिकटी | ९८.६ | ८२.७३ | ८४.३५ | ८२.५९ | ४४.९३ |
| | राजारामपुरी | ७०.२ | ६३.७२ | ६०.८५ | ६०.४१ | ५१.०२ |
| | लक्ष्मीपुरी | ६७.०८ | ७२.५२ | ६०.८० | ५९.६७ | ४२.९३ |
| | शाहूपुरी | ६७.७ | ५४.१३ | ५४.४२ | ५३.११ | ४२.०५ |
| | गंगावेस | - | ८५.४३ | ८४.७८ | ८३.६४ | ६०.६९ |
| | बिंदू चौक | - | ७७.३६ | ७२.१६ | ७२.०९ | ५२.४० |
| औद्योगिक | उद्यमनगर | ६७.५ | ५५.६२ | ५२.६० | ५९.५४ | ४५.१२ |
| | वाय.पी.पोवारनगर | ६१.३ | ५४.३३ | ५९.१८ | ५७.५८ | ४३.४५ |

पुण्यनगरी

# अंतिम वर्ष परीक्षेबाबत दोन दिवसांत निर्णय–उदय सामंत

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. येत्या दोन दिवसांत अंतिम वर्षाच्या परीक्षेचा विषय मार्गी लागेल. तसेच एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, तसे नियोजन विद्यापीठांना तयार करण्यास सांगितले आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली. परीक्षेसंदर्भात गुरुवारी राज्यपालांसोबत सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक होणार आहे, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.




## राज्यपालांसोबत केली चर्चा

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात राज्य सरकारने सहा कुलगुरूंची समिती नेमली आहे. ही समिती आपला अहवाल देणार आहे. त्यापार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवनावर भेट घेतली. या भेटीनंतर सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत करून केलेली कार्यवाही, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबतच्या भावना, कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकांची माहिती राज्यपालांना देण्यात आली.

'विद्यार्थ्यांना कमीत कमी त्रास होईल, अशा पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी राज्यपालांनी देखील सकारात्मक भूमिका दाखवली आहे. परीक्षा सहज, सोप्या पद्धतीने कशा घेता येतील तसेच विद्यार्थ्यांना मानसिक तणाव न येता परीक्षा घ्याव्यात यावर विचार करावा, अशा सूचना राज्यपालांनी केल्याचे सामंत यांनी सांगितले. ३ सप्टेंबरला राज्यपालांसोबत बैठक होणार आहे.

या बैठकीला राज्यातील १३ अकृषि विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित राहणार आहेत. कुलगुरूंच्या माध्यमातून राज्यपाल आढावा घेतील, असेही सामंत यांनी सांगितले.



# कवलाच्या फुलांनी बहरला विद्यापीठ परिसर

**पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पती**

**टेंबलाईवाडी, ता. २ :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर पिवळ्या फुलांचा गालीचा अंथरावा, असे दृश्य आहे. 'कवला' या गवतवर्गीय वनस्पतीची ही फुले असून, दहा ते पंधरा वर्षांपासून नित्यनियमाने या परिसरात ती उगवतात. याचे शास्त्रीय नाव स्मिथिया हिन्सुता असे आहे. ती पश्चिम घाटातील दुर्मीळ वनस्पती आहे. या फुलांमुळे विद्यापीठाचा मनोहारी परिसर आणखी बहरला आहे. विद्यापीठ परिसरात विपूल जैवविविधता पाहायला मिळते. विविध प्रकारचे किडे, पक्षी, सरीसृप, प्राणी इथे आहेत. वनस्पतींचे असंख्य प्रकार विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसरात आढळतात. आता 'स्मिथिया हिन्सुता' या वन्सपतींची भर पडली आहे. या वनस्पतीचे मराठीमधील नाव कवला किंवा कवळा असेही म्हणतात. ही वनस्पती गवतवर्गीय असून, तिला पिवळी फुले येतात. विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानात ही फुले पाहायला मिळतात. अत्यंत नाजूक असणारी ही फुले गालीच्या अंथरावा अशीप्रकारे भासतात. त्यांचा बहर एक वर्षाआड येतो. पाणथळ जागेत



शिवाजी विद्यापीठ परिसरात फुललेली कवलाची फुले.

ही वनस्पती उगवते. पूर्वी पश्चिम घाटातील पठारे, माळ येथे मोठ्या संख्येने दिसणारी ही वनस्पती आता कमी प्रमाणात उगवते. त्यामुळे तिचा समावेश दुर्मीळ प्रजातींत केला गेला आहे. उन्हे कलायला लागले की ही फुले आणि पाने मिटून घेतात. दुसऱ्या दिवशी पुन्हा उगवतात. साधारण लाजाळूसारखी तीन ते चार पानांच्या जोड्यांची संयुक्त पाने असतात. या पानांमधून वर कळ्यांचा झुपका येतो. एक किंवा जास्त फुले एकाचेळी फुलतात. हा फुलांचा बहर दोन ते तीन आठवडे जोरात असतो. नंतर शेंगा तयार होतात आणि त्या वाळून फुटतात. त्यातून पडलेल्या बियापासून पुन्हा पुढच्या वर्षी रोपे उगवतात. पिवळ्याधमक रंगांच्या या फुलांत लाल रंगाचा आकर्षक ठिपका असतो. त्यामुळे ती मिकी माउससारखी अनेक जणांना भासतात. त्यांना मिकी माऊस फ्लॉवर्स किंवा डोनाल्ड डक फ्लॉवर्स असेही म्हणतात.

**स्मिथिया हिन्सुता...**

'स्मिथिया' हे संशोधक सर जेम्स एडवर्ड स्मिथ यांच्या नावावरून घेतले आहे, तर त्याच्या खोडावर केसासारखी रचना दिसते, म्हणून पुढे हिन्सुता जोडले गेले. मराठीत कवळा किंवा कवला नावाने ओळखले जाते. भारताबरोबर ते चीन, जपान, मलेशिया, उत्तर ऑस्ट्रेलिया या देशातही आढळते. हे झाड साधारण १५ ते ९० सेंटिमीटरपर्यंत वाढते. काही भागांत याच्या पानांची भाजी खात असल्याचा उल्लेख आढळला. तसेच जमीन कसदार बनवण्यासाठी ही वनस्पती उपयुक्त ठरते.

> **स्मिथिया हिन्सुता ही वनस्पती दहा ते बारा वर्षांपासून शिवाजी विद्यापीठात उगवते. या वनस्पतीच्या फुलांवर मधमाश्या, फुलपाखरे पाहायला मिळतात. यातून याचे पर्यावर्णीय महत्त्व अधोरेखित होते. या वनस्पतीमुळे विद्यापीठाचा परिसर तर आकर्षक दिसतो.**
> **- प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे,**
> उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ.

e Sakal
व्हिडिओ पाहा